## प्रकरण पाचवे

## स मा रो प

## प्रकरण पाचवे

## स मा रो प

मराठी ग्रामीण साहित्याच्या वाङ्‌मयीन प्रवाहात अलिकडे खूपच बदल झाला असून समकालीन ग्रामीण साहित्यात प्रयोगशिलतेने लिहिणारे नवे लेखक आढळू लागले आहेत. वास्तविक पाहता ग्रामीण जीवनाचे बदलते स्वरुपच ग्रामीण साहित्यातील नवनवे प्रयोगशिल लेखन होण्यास कारणीभूत आहे. समकालीन ग्रामीण साहित्यात मोहन पाटील यानी चार लघुकादंब-या लिहून ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात आपले विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. लघुकादंबरी या वाङ्‌मयप्रकाराचा जाणीवपूर्वक अभ्यास करुन मोहन पाटलांनी हा वाङ्‌मयप्रकार आपल्या अनुभूतीच्या अविष्कारासाठी निवडला आहे. लघुकादंबरी एक वाङ्‌मयप्रकार म्हणून मोहन पाटील जेव्हा बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करण्यासाठी निवडतात तेव्हा त्यांच्या कादंब-याच्या अभ्यासास एक वेगळे महत्व प्राप्त होते. "लघुकादंबरी" या वाङ्‌मयप्रकाराची तात्विक मीमांसाही मराठी अभ्यासकानी अद्याप केलेली नाही. त्यामुळे मोहन पाटलांच्या कादंब-यांचा अभ्यास आणखी वेगळा ठरतो. त्याबरोबरच या अभ्यासाने वाङ्‌मयप्रकाराच्यादृष्टीने आणि बदलत्या ग्रामीण जीवनाचे स्वरुप जाणून घेण्याच्या दृष्टीने असे दुहेरी अभ्यासमूल्य या विषयाला प्राप्त झाले आहे. मोहन पाटील किंवा समकालीन ग्रामीण लेखकाचा असा अभ्यास यापूर्वी झालेला आढळत नाही. मोहन पाटलांच्या कादंब-यांच्या प्रकाशनानंतर वृत्त-पत्रीय परीक्षणाव्यतिरिक्त फारसे लेखन त्यांच्या कादंब-या संदर्भात झालेले नाही. म्हणून प्रस्तुत प्रबंधिकेच्या निमित्ताने मोहन पाटलांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन कादंब-यांच्या विशेष संदर्भात त्यांच्या कादं-ब-यांचा गंभीरपणे आणि सखोलपणे अभ्यास केलेला आहे.

अभ्यासाच्या सोयीसाठी प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात लघुकादंबरीच्या रचनात्मक स्वरूपाची तात्त्विक मीमांसा केली आहे. "लघुकादंबरी" हा कथात्मक साहित्याचाच एक प्रकार असल्यामुळे कथात्मक साहित्याच्या परंपरेचे स्वरूप या प्रकरणात पाहून कादंबरी आणि कथा या दोन वाङ्.मयप्रकारात असणारे वेगळेपण स्पष्ट केले आहे. त्याबरोबरच कथा आणि कादंबरी यांच्या उपप्रकारांची चर्चा करून विशेषत: दीर्घकथा आणि लघुकादंबरी यांच्यातील साम्यभेदाची विशेष चर्चा केली आहे. कारण लांबीच्या अवकाशाच्या दृष्टीने हे दोन्ही प्रकार जवळजवळ सारखे असल्यामुळे इथे लघुकादंबरी आणि दीर्घकथा यांच्यात गफलत होण्याची शक्यता असते. म्हणून लघुकादंबरीची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना त्याच्या भाषिक अवकाशाबरोबरच लघुकादंबरीच्या घटकांची चर्चा करून त्याचे वेगळेपण सिध्द केले आहे. लघुकादंबरीचे आशयसूत्र कसे अनेकांगी असते. त्यातील व्यक्तिचित्रण, वातावरण, निवेदन, या घटकांची चर्चा करत लघुकादंबरीची पृथगात्मता दर्शविणारी एक व्याख्याही प्रस्तुत प्रकरणाच्या अखेरीस दिलेली आहे. मोहन पाटलांच्या कादंब-यांच्या संदर्भात "लघुकादंबरी" एक वाङ्.मयप्रकार म्हणून पाहणे महत्वाचे ठरते.

दुस-या प्रकरणात "लिगाड" आणि "खांदेपालट" या कादंब-यामधील आशयसूत्रांचा विचार केला आहे. लघुकादंबरीची आशयसूत्रे अनेकांगी असतात. "लिगाड" आणि "खांदेपालट"च्या संदर्भात या आशयसूत्रांचे वर्गीकरण केले आहे. विशेषत: "लिगाड" या कादंबरीत "बदलत्या ग्रामीण जीवनाचे स्वरूप" चित्रित करणे हे या कादंबरीचे मुख्य आशयसूत्र असल्यामुळे ग्रामीण जीवनातील बदलत्या वास्तवाची चर्चा या प्रकरणात विस्ताराने केली आहे. त्याबरोबरच शेतीचे बदलते स्वरूप ग्रामीण जीवनात नव्याने उभ्या राहिलेल्या समस्या आणि ग्रामीण माणसांची झालेली कुचंबना रूढ परंपरागत ग्रामीण कादंबरीपेक्षा खूपच वेगळी वैशिष्ट्ये जाणवून देतात. मोहन पाटील ग्रामीण जीवनाच्या बदलत्या

स्वरूपाचे केवळ वर्णन करीत नाहीत तर ग्रामीण जीवनाची नवी अनुभूती वाचकमनाला आणून देण्याचे त्यांचे कौशल्य महत्वाचे आहे.

ग्रामीण जीवनातील बदलत्या परिस्थितीत तिथल्या बागायतदारांच्या जीवनात सुबत्ता आणि समृध्दी आली आहे. परंतु या समृध्दीतूनच ग्रामीण जीवनात वेगळया समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात. "खांदेपालट" या कादंबरीत मोहन पाटील यानी ग्रामीण जीवनातील राजकारणाला अधिक महत्व दिले आहे. किंबहूना "लिगाड"मध्ये सुध्दा साखरकारखाना, सहकारी पाणी-सोसायटी यासारख्या बदलत्या जीवनातील महत्वाच्या संस्था आणि त्यातील मंडळीचे राजकारण दिसते. त्याचबरोबर सत्तेच्या जोरावर लबाडी करून स्वार्थ साधण्याची आणि वरवर परोपकाराची भावना दाखविण्याची पध्दती ही नव्या ग्रामीण जीवनाची परिमाणे पाटलांच्या सर्वच कादंब-यात येतात. "खांदेपालट" या कादंबरीचे मुख्य आशयसूत्र राजकारणाचे असल्यामुळे या कादंबरीत राजकीय डावपेचांना सत्ताधिशांच्या बेरकीपणाला अधिक महत्व येते. परंतु त्याबरोबरच सामान्य माणसांची होणारी होरपळ आणि या सर्व नव्या परिस्थितीत ग्रामीण माणसाचे जाणवणारे दुभंगलेपण हे या कादंब-यांचे वैशिष्ट्ये आहे.

पुढील प्रकरणात "लिगाड" आणि "खांदेपालट" मधील सर्व व्यक्तिरेखांचा सूक्ष्मपणे परामर्श घेतला आहे. विशेषत: या कादंब-यातील प्रमुख व्यक्तिरेखा सामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तिरेखा, काही स्त्री व्यक्तिरेखा यांचा सविस्तर विचार करताना नकळत ग्रामीण जीवनातील जगण्यातील विविध स्तर स्पष्ट झाले आहेत. या व्यक्तिरेखांच्या अभ्यासातून त्यांच्या जगण्यात नव्याने उभ्या राहिलेल्या समस्या वाचकासमोर येतात. शेतक-यांची कुचंबना, स्त्रियांच्या जीवनाशी चाललेला खेळ, सामान्य माणसांचे अस्तित्वहीन जगणे, तरुणपिढीची दिशाहीन आवस्था आणि सगळ्यांचेच जाणवणारे एक दुभंगलेपण ग्रामीण जीवनाची दुर्बलता दाखवून देते.

त्यानंतर मोहन पाटलांच्या कादंब-यांची वैशिष्ट्ये तपासताना ग्रामीण जीवनातील बदलत्या परिस्थितीत जातीव्यवस्थेचे असणारे स्वरूप, दलितांची स्थिती आणि राजकारणातील गती, खेड्यातील प्रत्येक कुटुंबाचे होऊ घातलेले विघटन, शेतीचे बदलते व्यावसायिक स्वरूप, बदलत्या राजकारणाचे स्वरूप, सुशिक्षित वर्गामध्ये आलेले पांढरपेशेपण, त्यांची कुचंबना आणि दिशाहीन आवस्था दिसून येते. सत्ताप्रमुखांचा बेरकीपणा आणि त्यातून निर्माण होणा-या सामान्य माणसांच्या जीवनातील विविध समस्या हे मोहन पाटलांच्या कादंब-यांच्या आशयाचे वेगळे वैशिष्टये आहे. आणि हा आशय मोहन पाटील "लघुकादंबरी" या वाङ्.मयप्रकारातून व्यक्त करताना तो अधिकच प्रभावी बनला आहे. लेखकाच्या अभिव्यक्तिला लघुकादंबरी हा वाङ्.मयप्रकार योग्य ठरला आहे.

ग्रामीण जीवनाचे समग्र आकलन आणि ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टीकोण पाटलांच्या कादंबरीतून स्पष्ट झाला आहे. खेड्याच्या मानसिकतेचे त्यांना अचूक भान असून ही मानसिकता दुभंगलेली असलीतरी इथल्या मातीशी त्यांचे असणारे नाते अतूट आहे. त्यामुळे बदलत्या ग्रामीण जीवनातील वास्तव प्रकट करताना त्यांनी संवेदनशिलतेने ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण केलेले दिसून येते. तिथल्या जीवनातील चढउतार, बारकावे, सूक्ष्म तपशिल तितक्याच संवेदनशिलतेने त्यांनी टिपलेले जाणवतात. ग्रामीण समूहमनातील ताण-तणावे गट-तट संघर्ष, यामुळे निर्माण झालेल्या नव्या समस्येला तोंड देताना जीवनाला आलेले दुबळेपण स्पष्ट होत जाते. हे दुबळेपण पुरोगामी विचारांची नवी पिढी घालवू शकत नाही. निसर्ग आणि भाषाशैली या दृष्टीनेही त्यांच्या कादंब-या वैशिष्ट्यपूर्ण आढळतात. "लिगाड" आणि "खोदेपालट" यांचा विशेष अभ्यास करताना मोहन पाटलांच्या कादंब-यांची जी वैशिष्ठये आढळतात त्यावरून मराठी ग्रामीण वाङ्.मयाचा प्रवाह समृध्द आणि उज्ज्वल करण्यात या लेखकाचा महत्वाचा वाटा आहे असे म्हणाने अतिशयोक्ती होणार नाही.

# प रि शि ष्ट - "अ"

## श्री मोहन पाटील यांची वाङ्‌मयीन मुलाखत

मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनाविषयी काही प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांची उकल करून घेण्यासाठी प्रत्यक्ष लेखकाची मुलाखत घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लेखक मोहन पाटील यांची घेतलेली वाङ्‌मयीन मुलाखत येथे देण्याचे ठरविले आहे.

प्रश्न - ललित लेखनाकडे आपण केव्हापासून वळलात ?

पाटील - १९७१ सालापासून मी लिहितो आहे. सांगली मार्केट कमिटी (आताचे वसंत मार्केट) मार्फत "कृषिमित्र" या नावाचे एक मासिक प्रसिध्द होत असे त्यावेळी ग्रामीण भागातील नवोदित तरुण लेखकांना आपले साहित्य प्रसिध्दीस देण्याची, संपादकांना कार्यालयात जाऊन भेटायची ती एक जवळची वाट होती. विशेष म्हणजे ग्रामीण साहित्याला ते मासिक मोठा वाव द्यायचे ते एक आकर्षण.

प्रश्न - कथा, कविता आणि कादंबरी या वाङ्‌मय प्रकारात कोणता प्रकार आपणास अधिक महत्त्वाचा वाटतो ? व का ?

पाटील - यात सारेच प्रकार आपापल्यापरीने महत्त्वाचे. कविता हा प्रकार अधिक महत्वाचा. गवतपात्यावरील - एका थेंबात सारे आकाश प्रतिबिंबीत झालेले असते. कवितेचे तसे असते. कविता लिहितानाचा अनुभव कुणाला सांगता यायचा नाही. एक तर असंख्य गुलाबफूलं - पिळून त्याचे थेंबभर अत्तर होते. नाहीतर गुंजभर गुलकंद. कविता अशी सारे शरीर पिळून एका शब्दावाटे बाहेर येते. अर्थात तीच खरी कविता. कविता फार हाल करते. जीवाचे कवितेच्या वाट्याला राहाण्याचे जाऊ नये.

प्रश्न - लघु कादंबरी हा प्रकार हाताळण्यामागे कोणती प्रेरणा होती ? आपली या वाङ्.मय प्रकाराविषयी भूमिका कोणती ?

पाटील - "अनुष्टुभ्" मासिकाची पूर्वी रेऊ लघुकादंबरी स्पर्धा असायची, "कोंड-मारा" मी रेऊ लघुकादंबरी स्पर्धेसाठी पाठवली होती. ती त्यावेळेस उत्तेजनार्थ म्हणून स्वीकारली. प्रमोद मनोहर कोपार्डे यांची "पान पान जाळी" ही कादंबरी त्याच स्पर्धेत क्रमांक मिळवून बसली होती. "अनुष्टुभ" मासिकाची ही लघुकादंबरी स्पर्धा माझ्या लघुकादंब-यांची प्रेरणा नाही. या स्पर्धापूर्वी मी "फुलपाखरु" लिहिली होती. लघु-कादंबरी या वाङ्.मप्रकाराविषयी खास तात्त्विक अशी काही भूमिका नाही. पण मला जे वाटते ते असे. कादंबरीकार खूप उंचीवरुन संसाराचा अवकाश न्याहाळतो आणि कवळतो. लघु कादंबरीत संसार-चित्र असते पण ते लहानखुरे असते आणि माझ्या अनुभवानुसार हे संसार-चित्र लेखकाने अगदी जवळून पाहिलेले असते. कथा हा प्रकार या दोन्हीहून वेगळा. त्यात संसारचित्रातला एक अनुभव, एक घटक येतो. कथेचा अवकाश लहान. अलिकडे म्हणजे गेल्या दशकात ज्यानी खूप मोठ्या पानांच्या कादंब-या लिहिण्याचा प्रयत्न केला. त्या कुंथून लिहिल्या आहेत. त्याचा आवाका मुद्दाम फार मोठा केला आहे. वैश्विक आहे असं भासवण्याचा नुसता ऊरबडवेपणा केला आहे. मुळात भारतीय माणसाला कथा, फारतर लघु कादंबरी हाच प्रकार पेलत असावा. काही मोजके भारतीय लेखक सोडले (प्रेमचंद, शरबाबू, खांडेकर, नेमाडे कारंथ इ.) तर कादंबरीचा मोठा अवकाश पेलण्याचे सामर्थ्य कोणा-तही आजवर दिसले नाही. आपल्याकडे अगदी प्राचीन काळापासून "कथा"च लिहिली गेली. आपले सारे तत्वज्ञान "गोष्टी"च्या अव-गुंठणातून पाजले आहे. गोष्टीची सवय आहे. दुसरे म्हणजे "कादं-बरी" सारखे महान काही घडतही नाही जीवनात. हल्ली तर मोठमोठ्या कादंब-या लिहिण्यासाठी काही लेखक इतिहासाकडे पुन्हा वळत आहेत.

कागदपत्र उपलब्ध असतात. ती गोळा करून संगतवार लावून मोठी कादंबरी तयार करता येते. पण ते खरे नाही.

प्रश्न - आपल्या "फुलपाखरु" आणि "कोंडमारा" या पुस्तकाचा काही समीक्षकांनी दीर्घकथा म्हणून उल्लेख केला आहे. तो आपणास योग्य वाटतो काय ?

पाटील - नाही. "कोंडमारा" आणि "फुलपाखरु" या दोन्हीही लघुकादंबऱ्या आहेत. समीक्षकांनी लघुकादंबरीची अजून व्याख्याच केली नाही. अगदी खानोलकरांपासून ते अलिकडे मौजेने माझी "लिगाड" प्रसिध्द केले. तिथपर्यंत लघु कादंबऱ्या समोर ठेवलेल्या असताना समीक्षक बोलत नाहीत. त्यावर कारण माहिती नाही.

प्रश्न - "लिगाड" आणि "खांदेपालट" यातील दाजीतात्या आणि धोंडीनाना या व्यक्तिरेखा कशा सूचल्या ? व्यक्तिरेखाच कादंबरीच्या निर्मितीस कारण झाल्या की कादंबरीचा आशयच निर्मितीस कारण ठरला ?

पाटील - "लिगाड" आणि "खांदेपालट" मधले दाजीतात्या आणि धोंडीनाना या व्यक्तिरेखा भारतातल्या खेड्यात थोड्याफार फरकाने पदोपदी आढळतील. त्या प्रवृत्तीच आहेत. त्या काहीच सूचू देत नाहीत. त्या कादंबरीच्या आशयभूमीतून आपसूक उगवल्या आहेत.

प्रश्न - "लिगाड"मधील "रघू"सारखा शिक्षित तरूण नोकरी सोडून शेतीकडे वळणे हे ग्रामीण जीवनातील बदलाला छेद म्हणून कादंबरीत आपण का पाहिले नाही ? त्यामुळे आपला दृष्टिकोण निराशावादी वाटत नाही का ?

पाटील - "लिगाड"मधला रघू नोकरी सोडून शेतीकडे वळतो. याचे कारण

त्यांने कुठेतरी वाचले होते. गांधीचा संदेश "खेड्याकडे चला" तो शहराला वैतागून मातीच्या ओढीने गावाकडे येतो. हा रघुपुरता बदल आहे. छेद म्हणून काही नाही. माझ्या लेखनातील मानसपुत्रांना आणि कन्यांना जिथं जन्मलो तिथेच आपल वर्तुळ आखावं चूल मांडावी असं वाटतं. त्यांची मूलं परदेशात रुजत नाहीत. ती परमुलखात करपतात. उलट ती ज्या मातीतली आहेत तिथंच आपण जगत झगडंत राहवं आणि प्रामाणिक जगावं असं वाटते. म्हणून कधी कधी मलाही गुंगारा देऊन ती गावाकडं पळून जातात. हा पलायनवाद नाही. नैराश्य तर नाहीच. उलट त्यांची चिवट झुंज आहे. आपल्या आपल्याशी आणि आपल्या परिसराशी.

प्रश्न – "खांदेपाल्ट" मधील धोंडीनानाचा मुलगा धोंडीनानाच्या राजकारणाचा वारसदार ठरू शकत नाही. हा केवळ दैवदुर्विलास ? राजकारणातील आजच्या वास्तवाला कितपत धरून आहे ? धोंडीनानांचे हे दुबळेपण दाखविण्यामागील भूमिका कोणती ?

पाटील – "खांदेपालट"मधल्या धोंडीनानांचा पोरगा त्यांनी उभारलेल्या राजकारणाचा वारसदार ठरत नाही ही वस्तुस्थिती आहे. राजकारणात वारस वगैरे बोगस. तो उचलून घोड्यावर बसवण्यातला प्रकार आहे. आणि मग तुकारामाच्या एका उपहासप्रधान अभंगातील "असोनी उपाय म्हणे हाय हाय" वगैरेसारखा तो शोंदाड शिपाई ठरतो. हेच आजचे चित्र आहे. दुसरे "राजकारण" हा प्रकारच असा आहे की त्यास आजचे वास्तव कालचे वास्तव असा भेदच करता येणार नाही. धोंडीनानांच्या पोराला परिस्थितीच पांगळी करते. त्याला मी काय करू ?

प्रश्न – राजकारण हा आजच्या ग्रामीण जीवनात एक अपरिहार्य घटक आहे. परंतु केवळ राजकारणाने झालेले परिणाम चित्रित करणे महत्त्वाचे की याशिवाय काही मूल्यदर्शनाचे महत्व साहित्यातून यावे असे वाटते

पाटील - राजकारण हे स्वातंत्र्योत्तर खेड्यावरचे दाट आवरण आहे. मूल जन्मताना त्याच्या अंगाभोवती वार असते. तसे हे राजकारण. आजच्या प्रत्येक खेड्यात जी घटना जन्मते ती माझ्या माहितीप्रमाणे या राजकारणातूनच. निदान माझा तर अनुभव आहे. साधे पान-सुध्दा राजकारणाविना हलत नाही. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या-पूर्वी खेड्यात राजकारण पोहचले आणि शिक्षणापेक्षा ते अधिक चिरस्थायी झाले. धर्म, शिक्षण, समाजकारण, संस्कृती या सर्वांना पुरुन राजकारण दशांगुळे उरले आहे. अर्थात राजकीय घटनांची नुसती चित्रफित समर्थ लेखकाकडून अपेक्षित नाही. या जंजाळात सापडलेल्या माणसांचा जीवनसंघर्ष आणि जीवनशोध हा महत्त्वाचा.

प्रश्न - लघुकादंबरी या प्रकारातच लेखन करणे आपल्याला आवडेल की महा-कादंबरी लिहिण्याचा आपला मानस आहे ?

पाटील - प्रत्येक अनुभवाला एक स्वाभाविक आकार असतो. आवाका असतो. काही अनुभवव कविता होऊन येतात. तसे ते लघुकादंबरी म्हणूनही मनाला भिडतात. यापुढे महाकादंबरीचा अनुभव येणारच नाही हे भविष्य मी कसे वर्तावे ?

प्रश्न - प्रादेशिक आणि ग्रामीण असा भेद करावा का ? केल्यास याच्या सीमारेषा कोणत्या ? आपल्या कादंबऱ्यांना प्रादेशिक म्हणता येईल का ?

पाटील - "ग्रामीण" हे विशेषण आहे. पूर्वी यालाच काहींनी प्रादेशिक म्हटले. पण तशी प्रत्येक कादंबरीत प्रादेशिकता असतेच. पण ग्रामीण या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. भेदच मानायला झाल्यास नागरसंस्कृती आणि नागरसंस्कृती किंवा देशी संस्कृती

आणि विदेशी संस्कृती असा मानावा.जो नांगराशी एकनिष्ठ तो ग्रामीण, जो नगराशी एकनिष्ठ तो शहरी. यातही नांगराळलेले शहरी आणि शहराळलेले नांगरी लोक आढळतील. पण सोयीसाठी आपण पांढरपेशा नि नांगरगट्टया मानताच की. तसा भेद करता आल्यास आणि तो सर्वमान्य वाटला तर मानावा. आणि तो सर्वच वाङ्मय प्रकारात मानावा. या बाबतीत मला एक वाटते ते महत्वाचे आहे. फार प्राचीन काळी आपल्या भारतीयात वेद मानणारे ते वैदिक आणि वेद न मानणारे अवैदिक म्हणजे "लोक" असा फारक होता. या लोकांच्या साहित्याला (मौखिक) लोकसाहित्य मानले. वेद मानणारे ते आयात झालेले लोक आहेत असे म्हटले आहे. म्हणजे आर्य वगैरे बाहेरून आले इत्यादी. अर्थात आता हे सारे इथलेच आणि याच संस्कृतीचे व मातीचे झाले. तरीही हा भेद राहिलाच. (तुकाराम, महात्मा फुले इत्यादींनी वेदांचे ते सार आम्हाशीच ठावे. किंवा वेद हे भेद आहे असे म्हणावे लागले) मला वाटते ग्रामीण साहित्याचे मूळ या लोकांत आहे. अनागर संस्कृतीने जी कला वाङ्मय जतन करून परंपरेने टिकवून ठेवले ती संस्कृती प्रेरणाच ग्रामीण साहित्याच्यामुळाशी आहे. हा दृष्टिकोण प्रतिगामी नाही तर तो प्रतिशोध आहे आणि प्रतिशोधानेच पुरोगामित्व बळकट वगैरे करता येईल.

माझ्या आजवर पुस्तक रूपाने प्रसिध्द झालेल्या "कोंडमारा", "फुलपाखरू", "लिगाड", "खांदेपालट" अशा चार लघुकादंबऱ्या आहेत. त्याना प्रादेशिक वगैरे असं मी म्हणंत नाही. त्या देशी वाणाच्या आहेत. माझा सारं लेखनच गावाकडचं आहे. मी आजवर कधीही गाव खिडकीतून पाहिला नाही.

प्रश्न – कथात्मक साहित्यात झालेले ग्रामजीवनाचे चित्रण लक्षात घेऊन केल्या जाणाऱ्या आरोपाबाबत तुम्ही काही सांगू शकाल का ?

पाटील – कथात्मक साहित्यात आलेले ग्रामजीवनाचे चित्रण एकसुरी आहे असा आरोप साधारण १९६०–७० इथंपर्यंत ऐकू येत होता. मराठी जुन्या चित्रपटांनी तो बळकट केला होता. दुसरे आमच्याकडे समीक्षाही अजून वर्तमानपत्रीच आहे. दि.के. बेडेकर, वा.ल. कुलकर्णी, नेमाडे यानी काही स्वतःची ठोस समीक्षा तत्वं सांगितली. मर्ढेकरांनीही सांगितली आहेत. इतरानी हे बरोबर आहे नि ते बरोबर असण्याची शक्यता आहे असे मोघम काहीतरी सांगितले. ग्रामीण साहित्याची तर जाणूनबुजून दखल घेतली नाही. रा.रं. बोराडे, आनंद यादव, भोसले, डॉ. कोत्तापल्लेसर, वि.म. कुलकर्णी, चंद्रकांत बांदिवडेकर, या.वा. वडास्कर या मंडळीनी ग्रामीण साहित्यावर लिहिले. बाकी इतरांनी निव्वळ शेरेबाजी केली आहे. अलिकडे तर काही लेखक प्रथम समीक्षक गाठतात. मग ललित साहित्य लिहितात, मला वाटते लेखकाने लिहीत राहावे. समीक्षकांशी फटकून राहावे असे मी म्हणत नाही. पण समीक्षकांना माझ्यावर लिहा. माझे साहित्य गाजवा असा त्यांना त्रास देऊ नये. समीक्षकही माणूस असतो. मग तो एखाद्या लेखकाच्या अनेक क्लृप्त्याना बळी पडतो. तो केव्हा बळी पडला हे त्यालाही कळत नाही. आणि मग एखाद्या लेखकाला भावनेच्या भरात मोठं म्हटल्यावर नंतर त्या समीक्षकावर एक नैतिक बंधनच येते. मग पुढे त्याला आपले म्हणणेच खरे म्हणून अखेरपर्यंत तसेच म्हणत राहावे लागते. यात पुढे पुढे तो समीक्षकांना मोह घालणारा लेखकही संपतो नि समीक्षकही संपतो. मला तरी हे चित्र मराठी साहित्याच्या (ग्रामीण आणि नागर) दृष्टीने अतिशय हानिकारक वाटते. दुसरे म्हणजे १९६० नंतर ग्रामीण दलित अशा वेगळ्या चुली झाल्या. प्रत्येकांनी त्या वाटून घेतल्या. नेमाडे प्रभृती या सर्वांनाच रप्पाटे घालत राहिले. तीही एक स्वतंत्र चूल

झाली. आणि सारेच लोक माझ्याच चुलीवर शिजणारे साहित्य खरे म्हणून बसले. यात मराठी समीक्षा गोंधळली. एकतर अर्धवट इंग्रजी मुळीच नाहीत. नसलेले संस्कृत, अजिबात न आवडणारी मातृ-भाषा मराठी यात मराठी समीक्षक हा ठोस भाग शोधायचा कुठे ?

प्रश्न - खेड्याची म्हणून एक मानसिकता असते. आपण या मानसिकतेचे आकलन कसे मांडू शकाल?

पाटील - खेड्याची एक मानसिकता असते. नाहीतरी ती आहे. आणि ह्याच मानसिकतेचे चित्रण म्हणा, संघर्ष म्हणा ग्रामीण साहित्यात चित्रित झालेला असतो. (ही व्याख्या नव्हे) ही मानसिकता दुभंगलेली आहे. मातीशी तिची मूळं घट्ट आहेत. पण तिच्या फांद्या, फुलं मात्र कॉंक्रीटच्या तावदानातून आत बंगल्यात डोकावून पाहतात. यातनं शहराचे आकर्षणही वाटते. पण तिथं मूळं रुजत नाहीत. म्हणून पुन्हा मग मनाचे आक्रंदन सुरु होते. यातनं जे हुंदके बाहेर पडतात ते साहित्यावाटे ऐकू येतात. माझ्या बाबतीत उलटा प्रवास आहे. माझ्यातल्या साऱ्याच पात्रांना जिथं मूळ आहेत तिथन हलावंस वाटंत नाही. परिस्थितीन हलवत तर ती हट्टानं पुन्हा मातीकडं येतात. आपली माती सापडली की चिवटपणाने ती पकडून वाढंत झगडंत राहतात.

प्रश्न - बदलत्या खेड्यातील प्रश्नांचा आपण कोणत्या भूमिकेतून विचार करता ?

पाटील - "बदलते खेडे" हा नित्य प्रकार असणार आहे. आरंभ-विकास-लय-हे निसर्गसूत्रच आहे. त्यातनं प्रश्न निर्माण होणारच. या बाबतीत माझी भूमिका अशी खेडी बदलत आहेत. म्हणजे खेडी शहराकडे

जात आहेत असे नसून शहरांचा एक मोठा भूखंडच खेडयाकडे सरकत आहे. (मूळचा तो खेडयातलाच आहे) त्याबरोबर येणारे बरेवाईट परिणाम खेडयाच्या वाटयाला आज येत आहेत. शहरंच गावाच्या दिशेने सरकत आहेत. माझी बरीच पात्र म्हणूनच खेडयाकडं परत येतात. दुसरं आणि अत्यंत महत्वाचं म्हणजे शहर म्हणजे महानगर नव्हे. महानगराची नक्कल शहरात आणि शहराची नक्कल खेडयात असा प्रवास आहे. पैशाचे केंद्रही आता खेडयाकडे हळूहळू सरकत आहे. पण...... पण ...... या पुढच्या काळात खेडं हे पुढारलेलं व्हावं ते सुधारावं पुरोगामी व्हावं पण ते खेडंच राहवं. आणि शहर महानगर आपल्या ठिकाणी तसंच राहाव. नाहीतर अर्धनारी नटेश्वरासारखी आजची शहरं आणि अर्धबोवडी आजची खेडी यानीच तरुणांची मानसिकता बिघडवली. हे प्रश्न साहित्याला पडणारच.

.....

# परिशिष्ट - "ब"

## संदर्भग्रंथसूची


१. "अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका", सरदार, गं.बा., मॉडर्न बुक डेपो, पुणे, तृ.आ. १९७१.

२. "अभिरुची ग्रामीण आणि नागर", कुलकर्णी, गो.म. (संपादक) अ.भा.म.साहित्य संमेलन, कराड, १९७६.

३. "आधुनिक वाङ्मयाचा इतिहास", भाग-२, देशपांडे, अ.ना. व्हीनस् प्रकाशन, पुणे, द्वि. आ. १९७०.

४. "कादंबरी रचना", कुलकर्णी, श्री.म., मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८८.

५. "कोंडमारा" आणि "फुलपाखरु", पाटील, मोहन, सुरेश एजन्सी पुणे प्र.आ. १९८८.

६. "खडक आणि पाणी", गाडगीळ, गंगाधर, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६३.

७. "गाव-गाडा", आत्रे, त्रिंबक नारायण, ह.वि. प्रकाशन, मुंबई, तृ.आ. १९५९.

८. "गावरहाटी", दांडेकर, वि.म., मोटे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६३.

९. "ग्रामीण साहित्य", बोराडे, रा.रं., साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९२.

१०. "ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास", मुलाटे, वासुदेव, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९२.

११. "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या", यादव, आनंद, मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७९.

१२. "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध", कोतापल्ले, नागनाथ, पुणे, पॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९३५.

१३. "ग्रामीणता साहित्य आणि वास्तव", यादव, आनंद, मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८१.

१४. "ग्रामीण साहित्य एक चिंतन", भोसले द.ता., मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८८.

१५. "छांदसी", रेगे. पु.शि. मौज प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९६८

१६. "टीकाविवेक", क्षीरसागर, श्री.के., प्पॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९६५.

१७. "टीकास्वयंवर", नेमाडे भालचंद्र, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९०.

१८. "धार आणि काठ", कुरुंदकर नरहर, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र.आ. १९७३.

१९. "कटाक्ष", फडके, ना.सी., परचुरे प्रकाशन, मुंबई

प्र.आ. १९७३.

२० "नवकथाकार शंकर पाटील", कोत्तापल्ले, नागनाथ, इंद्रायणी प्रकाशन,

पुणे, प्र.आ. १९८६.

२१. "नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेय", जाधव, रा.ग. कॉन्टीनेंटल प्रकाशन,

पुणे, प्र.आ. १९५६.

२२. "पाचोळा आणि दहासमीक्षक", (संपादक, कोतापल्ले, नागनाथ)

साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९८९.

२३. "प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा", कुलकर्णी, श्री.र.

सिंधू प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९७०.

२४. "प्रतिभासाधन", फडके, ना.सी., देशमुख आणि कंपनी, पुणे,

सा.आ. १९६०.

२५. "तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा", यादव, आनंद, मेहता प्रकाशन, पुणे,

प्र.आ. १९८१.

२६. "स्फूट गोष्टी" (भाग १ ते ४), आपटे, हरिभाऊ, ढवळे प्रकाशन, मुंबई,

प्र.आ. १९३७.

२७. "मराठी कादंबरी तंत्र आणि विकास", बापट, गोडबोले,

व्हीनस प्रकाशन, पुणे, तृ.आ. १९७३.

२८. "मराठी कादंबरीचा इतिहास", बांदिवडेकर, चंद्रकांत,
मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८९.

२९. "मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा", बांदिवडेकर, चंद्रकांत,
मेहता प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९८३.

३०. "मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद", कुलकर्णी, दा.वि.
स्वाध्याय प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७६.

३१. "मराठी कथा उगम आणि विकास", शेवडे इंदूमती, सोमय्या प्रकाशन,
मुंबई, प्र.आ. १९७३.

३२. "मराठी कथा रूप आणि परिसर", हातकणंगलेकर, म.द.,
सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८६.

३३. "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (संपादक पवार, गो.मा.,
हातकणंगलेकर, म.द. ) प्यॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६.

३४. "मराठी ग्रामीण कथा", माडगूळकर, अंबादास, खांडेकर, सूर्यकांत,
ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६७.

३५. "मराठी कादंबरी पहिले शतक", देशपांडे, कुसमावती, मराठी साहित्य
संघ, मुंबई, प्र.आ. १९५४.

३६. "मराठी साहित्य समाज आणि संस्कृती", यादव, आनंद,
मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८५.

३७. "मराठी साहित्य दर्शन" (संपादक, वाळंबे, मो.रा.)

पुणे, अ.वि.प्रकाशन, प्र.आ. १९७३.

३८. "मराठी भाषा उद्गम आणि विकास", कुलकर्णी, कृ.पा.,

मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्र.आ. १९५६.

३९. "महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह"कादंबरी",

जोग, ल.ग. चिरंजीव प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६३.

४०. "मराठी साहित्य खंड ४", जोग, रा.श्री. (संपादक),

म.सा.प. पुणे, प्र.आ. १९६४.

४१. "मराठी साहित्यातील स्पंदने", कुलकर्णी, गो.म., सुपर्ण प्रकाशन,

पुणे, प्र.आ. १९८५.

४२. "मराठी साहित्याची निर्मिति प्रक्रिया", यादव आनंद,

मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७९.

४३. "मराठी भाषेचे मूळ", खरे, विश्वनाथ, म.स. मंडळ, मुंबई,

प्र.आ. १९७९.

४४. "लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र", फडके, ना.सी.,

व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६८.

४५. "रुपवेध", कुरुंदकर, नरहर, देशमुख आणि कंपनी, पुणे,

प्र.आ. १९६४.

४६. "वाङ्.मयीन वादस्थळे", कुलकर्णी, वा.ल., प्यॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९६२.

४७. "वाङ्.मयीन चर्चा आणि चिकित्सा", कवठेकर, बाळकृष्ण, नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, प्र.आ. १९७८.

४८. "समकालीन साहित्य" (संपादक पाटील, गंगाधर), प्रवृत्ती व प्रवाह विजय प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८५.

४९. "साहित्याच्या दरबारात", क्षीरसागर श्री.के., सुविचार प्रकाशन, प्र.आ. १९६१.

५०. "साहित्याचे मानदंड", गाडगीळ, गंगाधर, प्यॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६२.

५१. "साहित्य अध्यापन आणि प्रकार", (संपादक, भागवत, पु.भा. रसाळ, सुधिर इ.) प्यॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८७.

५२. "संशोधन : पध्दती प्रक्रिया अंतरंग", संत, दु.का. वि.गृ. प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६६.

५३. "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे", मुळे, उमाठे, म.वि. प्रकाशन, तृ.आ. १९८७.

५४. "स्वभावलेखन", सहस्त्रबुध्दे, पु.ग., मॉडर्न बुक डेपो, पुणे, प्र.आ. १९३८.

५५. "नयी कहानी की भूमिका", कमलेश्वर, शब्दाकार, दिल्ली, प्र.आ. १९७८.

......

## नि य त का लि के

१. प्रतिष्ठान : मार्च-एप्रिल, १९८३

२. दैनिक पुढारी, १७.८.१९९१.

३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, ८.८.१९९१

## अप्रकाशित निबंध

१. प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरी (१९७५ ते १९९०) राजन गवस, (गोवा, चर्चा सत्रात वाचलेला निबंध, नोव्हेंबर, १९९१)

.....

## मोहन पाटील यांच्या साहित्याची सूची

१. "गाव आणि मातीच्या कविता",
ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८२.

२. "राजयोग",
वसंतरावदादा सह. साखर कारखाना, सांगली,
प्रकाशन, प्र.आ. १९८४.

३. "कोंडमारा" आणि "फुलपाखरु",
सुरेश एजन्सी, पुणे, प्र.आ. १९८८.

४. "अकल्पित गोष्टी",
अक्षर प्रकाशन, सांगली, प्र.आ. १९८८.

५. "लिगाड" आणि "खांदेपालट",
मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९२.

......